मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड महापालिका सभेचे लाईव्ह प्रक्षेपण बंद

## ऑनलाईन प्रसारणामुळे अडचणी वाढल्याने थेट प्रक्षेपण बंद करण्याचा निर्णय; सोमवारीची सभा लाईव्ह नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका सर्वसाधारण सभेचे कामकाज शहरवासीयांना समजावे म्हणून सत्ताधारी भाजपने सभा कामकाजाचे ऑनलाईन प्रक्षेपण सुरू केले होते. मात्र, ऑनलाईन सभा कामकाजामुळे सत्ताधारीच अडचणीत येत असल्याने सोमवारी (दि. 15) होणाऱ्या सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण (लाईव्ह) केले जाणार नाही.




महापालिकेत दुसऱ्यांदा भाजपची सत्ता आली आहे. नवे कारभारी महापालिकेत आल्याने सर्वसाधारण सभेचे कामकाज ऑनलाईन केले जावे, अशी मागणी वाढली होती. त्याची दखल घेऊन महापौर रवी लांडगे यांनी आयुक्तांना सभा कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सभागृहाचे कामकाज ऑनलाईन करण्यात येत आहे. सर्वसाधारण सभेचे कामकाज शहरवासीयांना समजावे म्हणून सत्ताधारी भाजपने तो निर्णय घेतला होता.

सभेच्या थेट प्रक्षेपणामुळे नागरिकांसह सामाजिक कार्यकर्ते तसेच,नगरसेवकांच्या समर्थकांना नगरसेवक काय बोलले हे समजत होते. तर, कोणता नगरसेवक कोणत्या विषयावर कसा बोलत आहे, हे ही संपूर्ण शहरासमोर येत होते. तसेच, सभा कामकाजात नगरसेवक किती सहभाग घेतो, हे नागरिकांसह मतदारांना कळत होते. काही नगरसेवक थेट प्रक्षेपणातील स्वत:चा स्वतंत्र व्हिडीओ तयार करून त्याचे रिल्स बनवून सोशल मीडियावर व्हायरल करत होते. त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत होता.

### सोमवारच्या सभेचे थेट प्रक्षेपण नाही

**» अर्थसंकल्प सादर करण्यात येणार होता. त्यामुळे सर्वसाधारण सभेचे कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. नियमित होणाऱ्या मासिक सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण केले जाणार नाही. येत्या सोमवारी (दि. 15) होणार्या सर्वसाधारण सभेचे ऑनलाईन प्रक्षेपण केले जाणार नाही, असे सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले.**

# इंद्रायणी नदीत हजारो मासे मृत; देहूगावात प्रदूषणाचा गंभीर प्रश्न

## वारकरी भाविकांच्या आरोग्याचा धोका वाढला; नदीत दुर्गंधी आणि दूषित पाण्याची समस्या तीव्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

अधिक मासानिमित्त श्रीक्षेत्र देहूगाव येथे लाखो वारकरी भाविकांची गर्दी उसळलेली असताना इंद्रायणी नदीत हजारो मासे मृत्युमुखी पडल्याची धक्कादायक घटना शनिवारी उघडकीस आली. नदीच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात मृत मासे तरंगताना दिसून आल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून, वारकरी भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे



पालखी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना नदीपात्रातील ही स्थिती अत्यंत चिंताजनक मानली जात आहे. काही मास्यांमध्ये किडे पडल्याचेही निदर्शनास आले असून, यामुळे पाण्याच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका उपस्थित होत आहे.

या घटनेमागे नेमके कारण काय, याबाबत नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पाठबंधारे विभाग, देहू नगरपंचायत, संबंधित ठेकेदार तसेच बीव्हीएफ जावळे कन्स्ट्रक्शन यांच्यावर बोट दाखवले जात आहे. विशेषतः भामा-आसखेड धरणाच्या पाण्याच्या पाइपलाइनसाठी नदीचे पाणी अडविण्यात आल्याचा आरोप होत आहे. नगरपंचायतीने पाणी सोडण्याची मागणी करूनही पाठबंधारे विभागाकडून पाणी सोडण्यात आले नसल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकाराबाबत देहू देवस्थान मात्र मूग गिळून गप्प बसले असल्याने ग्रामस्थ नाराजी व्यक्त करू लागले आहेत.

दरम्यान, नदीतील पाण्याची पातळी कमी झाल्याने काही सोसायट्यांमधील मैलामिश्रित पाणी थेट इंद्रायणी नदीत सोडले जात असल्याचेही स्पष्ट झाले आहे. ज्या ठिकाणी हे दूषित पाणी मिसळते, त्याच परिसरात मोठ्या प्रमाणात मासे मृत झाल्याचे आढळले आहे. माळीनगर पाणवठा ते मुख्य मंदिरामागील घाट या पट्ट्यात ही परिस्थिती अधिक गंभीर आहे.

### 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चा पुढाकार

**» याच पार्श्वभूमीवर 'आर्ट ऑफ लिव्हिंग' संस्थेच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत नदीपात्रातील मृत मासे बाहेर काढून त्यांचे दहन केले. मात्र, प्रशासनाकडून अद्याप ठोस उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.**

### घाट परिसरात दुर्गंधी

**» नदीत वाढलेली जलपर्णी, दुर्गंधी, दूषित पाणी आणि मृत मास्यांचे प्रमाण लक्षात घेता वारकरी भाविकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे तात्काळ उपाययोजना करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी मागणी नागरिक व वारकरी भाविकांकडून जोर धरू लागली आहे. दरम्यान, या गंभीर प्रकाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशीही मागणी होत**

# पिंपरी-चिंचवड महापालिका शाळा 15 जूनपासून सुरू

## विद्यार्थ्यांचे औक्षण, मोफत पाठ्यपुस्तक वाटप आणि शाळांमध्ये आनंददायी वातावरणाची तयारी पूर्ण

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या सुटीनंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शाळा सोमवारपासून (दि. १५ ) सुरू होणार आहेत. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणामध्ये स्वागत करण्यासाठी विशेष तयारी करण्यात आली आहे. विशेषतः इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पहिल्याच दिवशी सर्व महापालिका शाळांमध्ये प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

या वेळी महापौर रवि लांडगे,आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्यासह पदाधिकारी, नगरसेवक, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त विविध शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. या वेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची उत्साहपूर्ण सुरुवात व्हावी यासाठी ते पालकांशी संवाद साधणार आहेत.

या प्रवेश उत्सवाद्वारे नव्याने शाळेत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत आकर्षक पद्धतीने करण्यात येणार असून, शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण मिळावे, यासाठी अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचे औक्षण, स्वागत, पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन तसेच, शैक्षणिक साहित्यांच्या माध्यमातून स्वागत करण्यात येणार आहे.

तसेच, शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना बालभारतीची मोफत पाठ्यपुस्तके वितरित करण्यात येणार आहेत. नवीन शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमाची सुरुवात तत्काळ होण्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरळीतपणे सुरू होण्यासाठी शिक्षण विभागामार्फत शाळा पूर्वतयारीची सर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

शाळा परिसराची स्वच्छता, वर्गखोल्यांची तयारी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बसण्याची सुविधा, डिजिटल शिक्षण साहित्य, शैक्षणिक साधनसामग्री तसेच शिक्षकांची उपस्थिती याबाबत आवश्यक नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित, आनंददायी व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.




### मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण

» नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताच विद्यार्थ्यांना अभ्यासात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पहिल्याच दिवशी बालभारतीची मोफत पाठ्यपुस्तके वितरित करण्यात येणार आहेत. अभ्यासक्रमाची सुरुवात वेळेत होण्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्याची उपलब्धता करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील भार कमी व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. महापालिकेच्या शिक्षण विभागाने सर्व शाळांमध्ये पाठ्यपुस्तके वेळेत पोहोचविण्याची व्यवस्था केली असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच आवश्यक साधनसामग्री उपलब्ध होणार आहे.

### प्रवेशोत्सवाने रंगणार शाळांचा पहिला दिवस

» महापालिका शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यासाठी प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेषतः इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पगुच्छ देऊन स्वागत तसेच शैक्षणिक साहित्य भेट देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण मिळावे, यासाठी शिक्षण विभागाने विशेष तयारी केली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबाबत आकर्षण निर्माण होण्यास मदत होणार असून पालकांचाही सहभाग वाढणार आहे. प्रवेशोत्सवातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सकारात्मक आणि प्रेरणादायी सुरुवात होणार आहे.

### शिक्षण विभागाची पूर्वतयारी पूर्ण

» शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व आवश्यक पूर्वतयारी पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती उपायुक्त ममता शिंदे यांनी दिली. शाळा परिसराची स्वच्छता, वर्गखोल्यांची तयारी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बसण्याची सुविधा, डिजिटल शिक्षण साहित्य तसेच शिक्षकांची उपस्थिती याबाबत आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित, आनंददायी आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळावे यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शाळांमध्ये विविध स्वागत उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहात होणार आहे.

# आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची नाले व नदीपात्रांची पाहणी

## पूरस्थिती टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर; अतिक्रमणांवर कठोर कारवाईचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील मान्सूनपूर्व तयारीला गती देण्यात आली असून, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी विविध नाले व नदीपात्रांची प्रत्यक्ष पाहणी करून कामांचा आढावा घेतला. नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करून सखल भागात पाणी साचू नये तसेच पूरस्थिती टाळण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

शिक्षक कॉलनी, पिंपळे निलख परिसरातील मुळा नदीपात्राची पाहणी करताना डॉ. सूर्यवंशी यांनी नदी व नाल्यांच्या वहनक्षमतेबाबत माहिती घेतली. अतिवृष्टीच्या काळात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांची दखल घेऊन तेथे तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले.



पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी सर्व यंत्रणांनी सतर्क राहून परस्पर समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

यामध्ये प्रामुख्याने अ, क, ड व ह या चार क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील नाल्यांची त्यांनी सखोल पाहणी केली.

अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत हायवे टॉवर नाला ( मुंबई पुणे हायवे ), क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत शरयू टोयाटो जवळील नाला,अगरवाल वाखरी जवळील नाला, एमआयडीसी बालाजी नगर झोपडपट्टी परिसरातील नाला, ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत गंगा पनामा सोसायटी जवळील नाला, ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत टी-१५४ ते फोरेशिया कंपनी परिसरातील नाला, कला सागर हॉटेल परिसरातील नाला, कुंदनगर नाला या नाल्यांची आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सखोल पाहणी केली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, अजिंक्य येळे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, राजू साबळे, योगेश फल्ले, अंकुश झिटे, शांताराम माने तसेच कार्यकारी अभियंते, उपअभियंते आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# मुदत ठेवीच्या हलगर्जीपणामुळे महापालिकेला दोन कोटींचा फटका

## ठेवीचे नूतनीकरण वेळेत न झाल्याने आर्थिक नुकसान; संबंधित अधिकाऱ्याला आयुक्तांची कारणे दाखवा नोटीस

**पुणे | प्रतिनिधी**

उत्पन्न वाढविण्यासाठी महापालिका वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करत असते. पालिकेची रक्कम बँकांमध्ये मुदत ठेव म्हणून ठेवताना अधिकाऱ्याने दाखवलेला हलगर्जीपणा नडला आहे. मुदत संपलेल्या ठेवी महिनाभर बचत बँक खात्यात पडून राहिल्याने पालिकेचे दोन कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्याला आयुक्तांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

दरम्यान, शुक्रवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत १,२५० कोटींच्या पाच मुदत ठेवी ठेवण्यास मंजुरी देण्यात आली. पालिकेच्या तिजोरीत शासकीय अनुदान, नागरिकांनी भरलेला कर तसेच ठेकेदारांची अनामत या रुपाने मोठी रक्कम जमा होते. यातील पाच हजार कोटींपेक्षा अधिकची रकम ठेवीच्या रुपाने विविध बँकांमध्ये ठेवली आहे. मे महिन्यात एका ठेवीची मुदत संपली होती.



### आयुक्तांकडून कारणे दाखवा नोटीस

» मुदत ठेवीच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव वेळेत सादर न केल्याबद्दल आयुक्त नवल किशोर राम यांनी लेखा व वित्त अधिकारी उल्का कळसकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. मुदत संपल्यानंतर तब्बल १५ दिवसांनी प्रस्ताव सादर करण्यात आल्याने अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी याबाबत आक्षेप घेतला होता. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे स्थायी समितीनेही मान्य केले आहे.

त्याआधीच ठेव नुतनीकरणाचा प्रस्ताव तयार करून मान्यता घेणे आवश्यक होते. मात्र, मुदत संपल्यानंतर १५ दिवसांनी वित्त आणि लेखा विभागाने याचा प्रस्ताव अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांच्याकडे दिला. मुदत ठेवीचे नुतनीकरण न झाल्याने एक जूनपर्यंत एक कोटी रुपयांचे नुकसान झाले. त्यामुळे कौर यांनी आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे तक्रार केली.

आयुक्तांनी लेखा आणि वित्त अधिकारी उल्का कळसकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावून ठेवीचे वेळेत नुतनीकरण का झाले नाही, अशी विचारणा केली. स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनीही याप्रकरणी प्रशासनामुळे नुकसान झाल्याचे कबूल केले. स्थायी समितीच्या बैठकीत २१० कोटी, १५० कोटीच्या दोन आणि ३५० कोटी रुपयांच्या दोन अशा एकूण १२५० कोटी रुपयांच्या मुदत ठेवी बँकेत ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

सरकारी धोरणानुसार आयुक्तांना ७० टक्के आणि स्थायी समितीला ३० टक्के ठेवी बँकेत ठेवण्यासाठी सूचना करता येतात. त्यानुसार स्थायी समितीने १५० कोटीच्या दोन आणि २१० कोटीची एक अशा तीन ठेवी ठेवण्यास मान्यता दिली. आयुक्तांनी ३५० कोटीच्या दोन ठेवी ठेवण्यास मान्यता दिली.

### महिनाभर ठेवी बचत खात्यातच

» पुणे महापालिकेच्या मुदत ठेवीचे वेळेत नूतनीकरण न झाल्याने पालिकेला तब्बल दोन कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले आहे. मुदत संपल्यानंतर ठेवीची रक्कम जवळपास महिनाभर बचत खात्यात पडून राहिल्यामुळे व्याजाचा लाभ मिळू शकला नाही. उत्पन्न वाढविण्यासाठी विविध उपाययोजना करणाऱ्या महापालिकेलाच प्रशासनातील हलगर्जीपणामुळे आर्थिक फटका बसल्याची बाब समोर आली आहे.

### १,२५० कोटींच्या नव्या ठेवींना मंजुरी

» या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत १,२५० कोटी रुपयांच्या पाच मुदत ठेवींना मंजुरी देण्यात आली. यामध्ये २१० कोटींची एक, १५० कोटींच्या दोन आणि ३५० कोटी रुपयांच्या दोन ठेवींचा समावेश आहे. महापालिकेकडे सध्या विविध बँकांमध्ये पाच हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम मुदत ठेवींच्या स्वरूपात गुंतवलेली असून त्याचे योग्य व्यवस्थापन करण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# पुणे रक्तदानात अव्वल; राज्यात नोंदणीकृत रक्तदाते 10 लाखांच्या उंबरठ्यावर

## पाच महिन्यांत 2,127 शिबिरे; पुणे जिल्ह्याची राज्यात आघाडी, स्वैच्छिक रक्तदानाला मिळतेय मोठा प्रतिसाद

**पुणे | प्रतिनिधी**

गंभीर अपघातातील उपचार असोत की, रुग्णालयात दाखल झालेला थॅलेसेमिया रुग्ण असो त्यांच्यासाठी रक्ताची उपलब्धता नवजीवन देणारी ठरते. अशा परिस्थितीत योग्य तो रक्तदाता उपलब्ध असण्याचे तसेच स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व अनमोल आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात रक्तदाता उपलब्धतेचे आश्वासक चित्र असून, त्यातही पुणे अव्वल असल्याचे दिसून आले आहे.

जागतिक रक्तदाता दिनाच्या पार्श्वभूमीवर आढावा घेतला असता, महाराष्ट्रातील रक्तदानाचे चित्र अत्यंत आश्वासक असून, राज्य आता १० लाख नोंदणीकृत रक्तदात्यांच्या ऐतिहासिक टप्प्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. सध्या राज्यातील नोंदणीकृत रक्तदात्यांची संख्या ९ लाख ८८ हजार ८११ वर पोहोचली आहे. केंद्र सरकारच्या 'ई-रक्तकोष' पोर्टलवरील आकडेवारीनुसार, स्वैच्छिक



रक्तदानाकडे लोकांचा ओढा वाढताना दिसत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषांनुसार, सुरक्षित रक्तपुरवठ्यासाठी लोकसंख्येच्या १ ते २ टक्के लोकांनी नियमित रक्तदान करणे गरजेचे असते. या निकषांचा विचार करता महाराष्ट्रातील वाढती नोंदणी आरोग्य व्यवस्थेला बळकटी देणारी आहे. रक्ताच्या प्रत्येक थेंबात एका आयुष्याची उमेद दडलेली असते, हे ओळखून पुणेकरांनी दाखवलेली ही तत्परता इतर जिल्ह्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

रक्तदानाची ही चळवळ बळकट करण्यात पुणे जिल्ह्याचे योगदान अत्यंत मोलाचे आणि वाखाणण्याजोगे ठरत आहे. राज्य रक्त संक्रमण परिषदेने दिलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, २०२५ सालातील जानेवारी ते मे या पाच महिन्यांच्या अल्प कालावधीत पुणे जिल्ह्यात तब्बल २,१२७ रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरांमधून सुमारे १.५८ लाख युनिट रक्त संकलित झाले असून, पुणे जिल्हा या कामगिरीत राज्यात आघाडीवर आहे.

### पुणे जिल्ह्याची राज्यात आघाडी

» रक्तदान चळवळ मजबूत करण्यात पुणे जिल्ह्याने राज्यात आघाडी घेतली आहे. राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या माहितीनुसार, जानेवारी ते मे २०२५ या पाच महिन्यांत पुणे जिल्ह्यात तब्बल २,१२७ रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून सुमारे १.५८ लाख युनिट रक्त संकलित झाले आहे. गंभीर रुग्ण, अपघातग्रस्त आणि थॅलेसेमिया रुग्णांसाठी ही रक्तपेढी जीवनदायी ठरत आहे.

# राजगुरुनगरमध्ये पाणीटंचाईचे गंभीर संकट; चासकमान धरणात केवळ 5.78 टक्के पाणी

## पावसाने दडी मारल्याने खेड तालुक्यात दुष्काळाची तीव्र शक्यता; शेतकरी व ग्रामस्थांचे जीवन संकटात

**पुणे | प्रतिनिधी**

"नको पांडुरंगा मला सोन्या-चांदीचं दान रे... फक्त भिजव देवा ने तहानलेलं रान रे..." शेतकऱ्यांच्या कणखर हृदयातून उमटणारी ही व्यथा आता वास्तवात उतरू लागली आहे. खेड तालुक्यात पावसाने दडी मारल्याने दुष्काळी स्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या सर्व पाणीस्रोतानी तळ गाठले आहेत आणि शेतीसाठी महत्त्वाच्या चासकमान धरणात केवळ ५.७८ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. ही गेल्या अनेक वर्षांतील सर्वात नीचांकी स्थिती आहे. गतवर्षी ही टक्केवारी १३.१८ टक्के होती आणि मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पाऊस पडायला सुरुवात झाली होती.

कळमोडी धरणात सध्या १६.३७ टक्के पाणीसाठा असून गतवर्षी ३१.५२ साठा होता. चासकमान धरणातील पाणी कमी झाले तर कळमोडीचे पाणी सोडण्यात येईल. असे असले तरी मुळात कळमोडी धरण लहान असून त्यातील साठाही कमी आहे. चासकमान धरणाची पाणी साठवण क्षमता ८.५० टीएमसी (अब्ज घनफूट) असून, कळमोडी धरणाची क्षमता १.५ टीएमसी आहे. तुलनेने भामा आसखेड धरणात २९.९४ टक्के पाणी उपलब्ध आहे. चाकण, चाकण एमआयडीसी, पिंपरी चिंचवड शहराला या धरणातून पाणीपुरवठा केला जात आहे.

खेड तालुक्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मुख्य आधार असलेल्या चासकमान धरणाची स्थिती चिंताजनक आहे. सामान्यतः या काळात धरणात चांगला साठा असतो, परंतु यंदा पहिल्यांदाच ६ टक्क्यांवर पोहोचले आहे. परिणामी पिण्याच्या पाण्याचा, जनावरांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. पाऊस पाण्याअभावी शेतीसोबतच शेतीपुरक दुग्ध व्यवसाय, पोल्ट्री व्यवसाय, अन्न-धान्य खरेदी-विक्री, भाजीपाला व्यवसाय अडचणीत येणार आहे. दुभत्या जनावरांना सांभाळणे कठीण होणार आहे. शेतकरी आधीच कर्जबाजारी आणि खर्चाच्या ओझ्याखाली दबलेले आहेत, त्यात पाऊस न पडल्यास यंदाचा खरीप हंगाम पूर्णपणे वाया जाण्याची शक्यता आहे.



### शेती, पशुधन आणि रोजगारावर संकट

**» पावसाअभावी खरीप हंगाम धोक्यात आला असून शेतीपूरक व्यवसायांनाही फटका बसण्याची शक्यता आहे. दुग्ध व्यवसाय, पोल्ट्री, भाजीपाला उत्पादन तसेच अन्नधान्य खरेदी-विक्रीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. चाऱ्याची टंचाई निर्माण झाल्यास दुभत्या जनावरांचे संगोपन कठीण होणार आहे. शेतमजुरांनाही रोजगाराचा प्रश्न भेडसावू शकतो. शेतकरी आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले असताना पाऊस न झाल्यास आर्थिक संकट अधिक गडद होणार असल्याचे शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे.**

### चासकमान धरणातील चिंताजनक स्थिती

**» खेड तालुक्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मुख्य आधार असलेल्या चासकमान धरणात सध्या केवळ ५.७८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच काळात धरणात १३.१८ टक्के पाणी होते. धरणाची एकूण क्षमता ८.५० टीएमसी असून सध्याची स्थिती गेल्या अनेक वर्षांतील नीचांकी मानली जात आहे. पावसाने दडी मारल्यामुळे धरणातील साठा झपाट्याने घटला आहे. त्यामुळे शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून शेतकरी वर्गात मोठी चिंता निर्माण झाली आहे.**

### १०४ टँकरद्वारे पाणीपुरवठा

**» जिल्ह्यातील वाढत्या पाणीटंचाईमुळे प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. खेड, आंबेगाव, जुन्नर, शिरूर आणि पुरंदर या टंचाईग्रस्त तालुक्यांमध्ये मिळून १०४ शासकीय टँकर कार्यरत आहेत. खेड तालुक्यातील अनेक गावे, वाड्या-वस्त्या आणि आदिवासी भागांमध्ये या टँकरच्या माध्यमातून पिण्याचे पाणी पोहोचवले जात आहे. शेतकरी संघटनांनी सरकारकडे दुष्काळ निवारण उपाययोजना, टँकर पुरवठा वाढवणे आणि शेतीसाठी पाणी राखीव ठेवण्याची मागणी केली आहे.**

# वडगाव बुद्रुकमध्ये महामार्गावरील राडारोडा हटवला; वाहतूक सुरळीत

## महापालिकेने दखल घेत दोन महिन्यांपासून पडलेला राडारोडा हटवल्याने मुंबई-बंगळुरू महामार्गावरील कोंडी दूर झाली

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर वडगाव बुद्रुक परिसरात राडारोडा, माती आणि मुरुमाचे ढीग गेल्या दोन महिन्यांपासून पडून असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. महापालिका प्रशासनाने या मार्गावरील राडारोडा उचलल्याने वाहतुकीतील अडथळा दूर झाला आहे.वृत्तपत्र सदस्यता

मुंबई महामार्गावर वडगाव बुद्रुक येथे माजी नगरसेवक विकास दांगट यांच्या ऑफिससमोर रस्तारुंदीकरणात येणारी मोठी झाडे तोडून मोठे खोदकाम करण्यात आले होते. या खोदकामाचा राडारोडा व मातीचे ढीग गेल्या दोन महिन्यांपासून महामार्गालगत पडून होते. यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होऊन कोंडी देखील होत होती.

यामुळे वाहनचालक, प्रवासी आणि नागरिकांची गैरसोय होत होती. दांगट यशगंगा ऑफिस ते स्वर्णा हॉटेलपर्यंतच्या रस्त्यावरच हा राडारोडा अस्ताव्यस्त पडलेला होता. महापालिका प्रशासनाने या वृत्ताची दखल घेत महामार्गालगत पडलेला राडारोडा व मातीचे ढीग त्वरित उचलून संपूर्ण रस्ता मोकळा आणि सपाट केला आहे. यामुळे महामार्गावर वाहतुकीतील अडथळा दूर झाल्याने वाहनचालक आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

महापालिकेच्या कारवाईनंतर दांगट यशगंगा कार्यालय ते स्वर्णा हॉटेल या मार्गावरील रस्ता पूर्णपणे मोकळा आणि सपाट करण्यात आला आहे. त्यामुळे वाहतुकीतील अडथळा दूर होऊन वाहनांची ये-जा सुरळीत झाली आहे. महामार्गावर होणारी कोंडी कमी झाल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाच्या या कारवाईचे स्वागत करत भविष्यात अशा समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



### महामार्गावरील अडथळा हटला

**» मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव बुद्रुक परिसरात राडारोडा, माती आणि मुरुमाचे ढीग गेल्या दोन महिन्यांपासून पडून असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला होता. महापालिका प्रशासनाने तातडीने कारवाई करत महामार्गालगत पडलेला राडारोडा आणि मातीचे ढीग हटवले. यामुळे रस्ता मोकळा व सपाट करण्यात आला असून वाहतुकीतील अडथळा दूर झाला आहे. वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या या कारवाईबद्दल समाधान व्यक्त केले आहे.**